04-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 5/3/2025 10:23 PM Page 1



# वेळेचे नियोजन केल्याने निश्चित परीक्षेत यश

## समुपदेशक सुषमा कवठणकर | आंबिये महाविद्यालयात विशेष व्याख्यान उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**विर्नोडा, दि. ३ :** परीक्षेच्या पूर्वी आणि परीक्षेच्या कालावधीत वेळेचे योग्य नियोजन केल्यास कोणत्याही तणावाला सामोरे जावे लागणार नाही, शिवाय परीक्षेत घवघवीत यश मिळेल, असे प्रतिपादन आंबिये महाविद्यालयातील समुपदेशक सुषमा कवठणकर यांनी केले.

कोंकणी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या परीक्षेच्या दृष्टिकोनातून तणावाचे व्यवस्थापन या विषयावरील विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ.ल्युसी जेम्स, कार्यक्रमाच्या मुख्य संयोजिका कोकणी विभागातील प्राध्यापिका मानसी धाऊसकर आदी मान्यवर उपस्थित होते.



**विर्नोडा : मुख्य मार्गदर्शक समुपदेशक सुषमा कवठणकर, प्रभारी कोकणी प्रमुख डॉ. ल्युसी जेम्स, व्याख्यानाच्या मुख्य संयोजिका प्रा. मानसी धाऊसकर, प्राध्यापक वर्ग व मान्यवर.**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपप्राचार्य आणि प्रभारी कोंकणी प्रमुख डॉ. ल्युसी जेम्स यांनी या विशेष व्याखानाचे आयोजन केल्याबद्दल संयोजिका प्रा. मानसी धाऊसकर यांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. प्रा. मानसी धाऊसकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. मुख्य मार्गदर्शक समुपदेशक सुषमा कवठणकर यांची ओळख आर्या राऊत यांनी करून दिली. सूत्रसंचालन सानिका गावकर यांनी केले तर आभार नम्रता सामंत यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

**प्रभावी सादरीकरणामुळे विद्यार्थी भारावले**

समुपदेशक सुषमा कवठणकर यांनी पारंपरिक व्याख्यानपद्धतीला छेद देत पीपीटी सादरीकरणासह विद्यार्थ्यांना सहज आणि सुलभपणे विषय समजावून सांगितल्याने विद्यार्थ्यांना या व्याख्यानाचा खूपच लाभ झाला. शिवाय व्याख्यान संपल्यानंतर १० मिनिटे ध्यानधारणेचे महत्त्व सांगून ते विद्यार्थी आणि शिक्षकांकडून करून घेतल्याने त्याचा फायदा विद्यार्थी व शिक्षकांनाही झाला.

### सोशल मीडियाचा वापर टाळा

**परीक्षेच्या वेळी शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे स्वास्थदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. ते व्यवस्थित राखणे प्रत्येक विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर टाळावा, त्यामुळे कोणत्याही प्रकारचा तणाव उद्‌भवणार नाही.**

पान १ वरून

### मोफत पाणीपुरवठा योजना बंद केल्याबद्दल सरकारवर टीका

जेव्हा एलपीजी सिलिंडरच्या तीन मोफत पुरवठ्याचे आश्वासन दिले गेले होते, तेव्हाही गोमंतकवासीयांना फसवले गेले होते. आता त्याच पद्धतीने गरजूंना पाणीपासून वंचित केले जात आहे. ही व्यवस्था पूर्णपणे अन्याय्य आणि अक्षम्य आहे, अशी टीका करत त्यांनी सरकारवरील जनतेचा विश्वास ढासळण्याचा इशाराही दिला.

### चेंगराचेंगरीत अडकलेल्या मित्राचे वाचवले प्राण

या प्रकारांना जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर फक्त बदल्या करून चालणार नाही, तर त्यांच्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

### पाकिस्तानकडून बॅलिस्टिक क्षेपणास्त्र चाचणीची तयारी

स्थगित केला आहे. पाकिस्तानने सिंधू जल करार रद्द करण्याच्या भारताच्या निर्णयाला विरोध केला असून, पाण्याचा प्रवाह रोखण्याचा कोणताही प्रयत्न युद्धजन्य कृती म्हणून मानला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# बांदा सटमठवाडी रस्ता काम पूर्ण न केल्यास आंदोलन

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ संतप्त ग्रामस्थांचा इशारा

**बांदा, दि. ३ :** मुंबई गोवा महामार्गावर बांदा सटमठवाडी येथे सुरू असलेले बॉक्सवेल व दोन्ही बाजूच्या सेवा रस्त्याचे काम हे धिम्या गतीने होत असून कामास विलंब होत आहे. दोन दिवसांपूर्वी या ठिकाणी अपघात होऊन एकाचा बळी गेला आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी सदर रस्त्याचे काम पूर्ण करावे, तसेच तात्काळ कामास प्रारंभ न केल्यास सटमठवाडीतील ग्रामस्थांना या ठिकाणी आंदोलन करावे लागेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला. याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना सटमट वाडी ग्रामस्थांनी निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, मागील एक वर्षापासून या ठिकाणी बॉक्सवेलचे काम सुरू आहे. एका बाजूला तीव्र उताराचा सेवा रस्ता बनवण्यात आला असून दुसऱ्या बाजूचा सेवा रस्ता करण्यासाठी टाळाटाळ करण्यात येत आहे. गेले तीन महिने याबाबत स्थानिक ग्राम पंचायत प्रशासन राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी यांचे लक्ष वेधूनही सेवा रस्ता बनविण्यास टाळाटाळ होत आहे. आजपर्यंत या ठिकाणी अपघात होऊन बारा जणांचे बळी गेले आहेत. निदान पावसाळ्यापूर्वी या सेवा रस्त्याचे काम पूर्ण करून ग्रामस्थ व विद्यार्थी यांची होणारी गैरसोय टाळावी. अन्यथा सटमठवाडीतील ग्रामस्थ रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असे शेवटी म्हटले आहे.

माजीमंत्री तथा आमदार दीपक केसरकर यांना देखील सटमठवाडी ग्रामस्थांनी निवेदन देऊन बॉक्सवेल व सेवा रस्त्याच्या कामाबाबत लक्ष वेधले आहे. यावेळी आनंद वसकर, आनंद मावळणकर, तेजस कळंगुटकर, रेश्मा मावळणकर, सुप्रिया नाईक, प्रमोद कळंगुटकर, संतोष वीर, प्रमोद मावळणकर, रोहिणी गोरे, भारती वीर, तन्मय आरोस्कर, संजय केळुसकर, संचिता कळंगुटकर, स्नेहा मावळणकर, विनिता कळंगुटकर, ऋतुजा वीर, मधुरा गोरे आदीसह महिला संघर्ष समिती सदस्य उपस्थित होते. काम सुरू न झाल्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येणार आहे.

# कमळेश्वरच्या प्राथमिक विद्यालयाच्या नूतन इमारतीची पायाभरणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ३ :** कोरगांवच्या श्री कमळेश्वर शिक्षण प्रसारक संस्थेच्या देऊळवाडा प्राथमिक विद्यालयाच्या नवीन इमारतीची पायाभरणी नुकतीच करण्यात आली.

श्री कमळेश्वर शिक्षण प्रसारक संस्थेच्या देऊळवाडा प्राथमिक विभागाचे व्यवस्थापक पुंडलिक शेट्ये यांच्या हस्ते ही पायाभरणी करण्यात आली. यावेळी श्री कमळेश्वर शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्याम शेट्ये, चेअरमन परशुराम गावडे, सचिव नीलकंठ थळी, माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष आत्माराम गावडे, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य सखाराम च्यारी, संस्थेचे ज्येष्ठ सदस्य नामदेव गावडे, मनोहर काळसेकर, रामा शेट्ये, मदन शेट्ये, कंत्राटदार श्री गवंडी, श्री कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य जुही थळी, श्री कमळेश्वर हायस्कूल पेठेचावाडाचे मुख्याध्यापक आत्माजी नाईक, देऊळवाडा हायस्कूलचे मुख्याध्यापक भालचंद्र हिरोजी, माजी मुख्याध्यापक गोविंद गणपुले, धर्मा शेट्ये, लक्ष्मण गावडे, यांच्यासह श्री कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय, कोरगांव, श्री कमळेश्वर हायस्कूल देऊळवाडा, पेठेचावाडाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**कोरगाव : कमळेश्वर शिक्षण प्रसारक संस्थेच्या देऊळ वाडा येथील प्राथमिक विद्यालयाच्या नवीन इमारतीची पायाभरणी करताना शाळेचे व्यवस्थापक पुंडलिक शेट्ये. सोबत अध्यक्ष ॲड. श्याम शेट्ये, चेअरमन परशुराम गावडे, सचिव नीलकंठ थळी व इतर.**

श्री कमळेश्वर शिक्षण प्रसारक संस्थे तर्फे कोरगावात दोन पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विद्यालय आहेत तर एक उच्च माध्यमिक विद्यालय चालवले जाते.

# डोंगरपाल रस्त्यासाठी ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा दि. ३ :** डोंगरपाल येथील रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून गेली अनेक वर्ष संबंधित विभागाकडे तसेच शासन दरबारी वारंवार पाठपुरावा क रून सुद्धा याबाबत आश्वासनापलीकडे कोणतीही कारवाई झाल्यामुळे डोंगरपाल ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. या रस्त्याचे काम तात्काळ न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा डोंगरपाल ग्रामस्थांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

यावेळी बोलताना डोंगरपाल येथील ज्येष्ठ नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते गुणाजी गवस यांनी सांगितले की, गेली अनेक वर्षे फकीरपाटा डोंगरपाल कळणे, रस्ता नंबर ११९ या रस्त्याची दुरवस्था आहे. त्यासाठी २०२३ मध्ये ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिला होता. तेव्हा पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून हा रस्ता करण्यात येईल असे त्यांना सांगून एप्रिल २०२४ पर्यंत रस्ता होईल असे आश्वासन देण्यात आले मात्र ते काम झालेच नाही. त्यामुळे २०२४ मध्ये ग्रामस्थांनी पुन्हा १५ ऑगस्ट रोजी उपोषणचा इशारा दिला यावेळी अधिकार्यांनी त्यांची भेट घेऊन सांगितले की रस्ता मंजूर झाला आहे उपोषण करू नये. त्यामुळे उपोषण स्थगित करण्यात आले .पुढे निवडणूक लागली व आचारसंहिता लागली त्यामुळे काम बारगळले. निकालानंतर निविदा निघाली चार जणांनी निविदा भरली व कुडाळ येथील व्यक्तीची मंजूर झाली. आराखडा तयार करून फाईल मंत्रालयात गेली परंतु तीन महिने काही कारवाई झाली नाही . त्यामुळे २८ फेब्रुवारी रोजी पालकमंत्र्यांकडे निवेदन देण्यात आले. हे काम एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण व्हायचे होते. मात्र मे महिना लागला तरी रस्त्याची दुरावस्था कायम आहे त्यामुळे आता अपघात होऊन बळी जाण्याची वाट शासन पाहत आहे का असा सवाल त्यांनी केला.

# विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे योगदान कायम लक्षात ठेवावे

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ अधिकारी गिरीश बैलुडकरसाखळी सरकारी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा

**साखळी, दि. ३ :** साखळी सरकारी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी ही माझी ओळख माझ्यासाठी अभिमानास्पद असून माझ्या जडणघडणीत या महाविद्यालयाचा मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी सतत शिकत राहावे, तसेच वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात नैतिक आचरण ठेवावे. आपले व्यक्तिमत्त्व घडविण्यात शिक्षकांनी दिलेले योगदान विद्यार्थ्यांनी कायम लक्ष्यात ठेवावे व यश मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन उत्तर गोव्याचे वन परिक्षेत्र अधिकारी गिरीश बैलुडकर यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथे आयोजित केलेल्या पारितोषिक वितरण सोहळा आणि पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ सोहळ्यातील प्रमुख पाहुणे या नात्याने वन परिक्षेत्र अधिकारी गिरीश बैलुडकर बोलत होते.

यावेळी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, पदव्युत्तर विभागाचे उपप्राचार्य शरत जमखंडी, शैक्षणिक विभागाच्या उपप्राचार्या प्रीती पेडणेकर, प्रशासकीय विभागाच्या उपप्राचार्य रोझालिना डिसिल्वा, विद्यार्थी कल्याण समितीचे संयोजक डॉ. सागर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी मान्यवरांचे स्वागत करून वार्षिक अहवालाचे वाचन केले. प्रमुख पाहुणे गिरीश बैलुडकर यांची ओळख उपप्राचार्य शरत जमखंडी यांनी करून दिली. कृतिका नावेलकर यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार डॉ. सागर पाटील यांनी मानले. अंकुश सिनारी, गॉर्डन पायरस, रोहिणी कमलाकर, अभिषेक मिश्रा या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामुळे झालेला लाभ आणि शिक्षकांबद्दलची कृतज्ञता आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

सर्वोत्कृष्ट सर्वगुण संपन्न विद्यार्थी पुरस्कार – रिफा शेख, साईश गावडे, नुरेन शाह, माधवराज परब, गॉर्डन पायरस, प्रियांका कोटेकर, भावार्थ धोंड, आस्मा मुजावर, वैष्णवी गावस. सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापरकर्ता पुरस्कार धनश्री जाधव. सर्वोत्कृष्ट मंडळ सदस्य पुरस्कार–सुजल शिरोडकर आणि यश शेट्ये. सर्वोत्कृष्ट एनएसएस स्वयंसेवक पुरस्कार–शिवम चोडणकर, सर्वोत्कृष्ट एनसीसी कॅडेट पुरस्कार–एसयुवो आस्मा मुजावर, सर्वोत्कृष्ट आउटगोइंग विद्यार्थी पुरस्कार–आस्मा मुजावर, सर्वोत्कृष्ट खेळाडू आणि क्रीडा महिला पुरस्कार आर्यन साळुंखे आणि सेजल नाईक यांना प्राप्त झाला.

# पहलगाम हल्ल्याचा केपेत निषेध

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३ :** माजी उपमुख्यमंत्री व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत (बाबू) कवळेकर यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या केपे मंडळाने शांतता यात्रा काढून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला व या हल्ल्यात मरण पावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहिली.

या शांतता यात्रेत दहशतवाद व दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानच्या विरोधात नारे देण्यात आले. केप्याच्या नगराध्यक्ष दिपाली नाईक, उपनगराध्यक्ष अमोल काणेकर, नगरसेवक दयेश नाईक, सुचिता शिरवाईकर, चेतन हळदणकर, गणपत मोडक व प्रसाद फळदेसाई, दक्षिण गोवा भाजपचे अध्यक्ष प्रभाकर गावकर, केपे मंडळ अध्यक्ष कृपेश वेळीप, माजी अध्यक्ष संजय वेळीप व भाजपचे कार्यकर्ते, केपे मतदारसंघातील सरपंच, पंच व नागरिक या यात्रेत सहभागी झाले.




**केपे : काढण्यात आलेली निषेध फेरी.**

पहलगाम येथील भ्याड हल्ल्यात निरपराध भारतीयांच्या झालेल्या हत्येचा भारतातच नव्हे तर जगभरातून निषेध होत आहे. या घटनेमुळे भारतीय रागाने खदखदत असून भारतीयांच्या या भावनेची जाणीव असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या चेहऱ्यावर या दहशतवाद्यांच्या विरोधात योग्य ती कारवाई करण्याचा निर्धार दिसत आहे, असे कवळेकर यांनी यावेळी सांगितले.

सिंधू नदीचे पाणी बंद करण्याचा निर्णय पंतप्रधान मोदींनी घेतलेला असून दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी आणि दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी पुढे आणखी कडक पावले मोदी उचलतील असा विश्वास कवळेकर यांनी व्यक्त केला.

प्रभाकर गावकर, दयेश नाईक, प्रसाद फळदेसाई, अमोल काणेकर व संजय वेळीप यांचीही यावळी भाषणे झाली.

# गिरदोलीत रूफटॉप जलसंधारण प्रकल्पांचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३ :** कुंकळ्ळीचे आमदार युरी आलेमाव यांच्या हस्ते गिरदोली येथे रूफटॉप वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले आणि भविष्यात असे आणखी प्रकल्प उभारण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

विरोधी पक्षनेते युरी आलेमाव म्हणाले की, जलसंपदा खात्याचा हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असून, त्यामुळे पावसाचे पाणी साठण्यास मदत होते.

गिरदोली येथील पालोटी निवास आणि सेंट फ्रांसिस झेवियर चॅपल येथे हे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत.

या उपक्रमाचा उद्देश पर्जन्यजल संवर्धनाला चालना देणे आणि पाणीटंचाई दूर करणे हा आहे. समाजाच्या फायद्यासाठी आणि पाणीटंचाईच्या समस्येवर प्रभावीपणे तोडगा काढण्यासाठी असे आणखी प्रकल्प राबविण्याची आमची योजना आहे, असे आलेमाव यांनी सांगितले.

छतावरून पावसाचे पाणी साठविल्यास वादळी पाण्याचा उपसा कमी होऊन पाणीटंचाई दूर होण्यास मदत होईल, असे ते म्हणाले.

जलसंधारणासाठी हा किफायतशीर उपाय आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी अनेक संस्था काम करताना आपण पाहतो. हे कौतुकास्पद काम आहे कारण ते आपल्या जगण्याला आधार देतात. समाजासाठी योगदान देणाऱ्या अशा उपक्रमांना पाठिंबा देण्याची गरज आहे,' असे आलेमाव म्हणाले.

आलेमाव यांनी पुढे सांगितले, या प्रकल्पांचा हेतू पूर्ण होईल याची आपण खात्री केली पाहिजे. पावसाच्या पाण्याचा वापर करून आपण समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतो.' छतावरील जलसंधारणाच्या प्रकल्पांमध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाचा साधेपणा आणि देखभालही त्यांनी अधोरेखित केली.




**CHANGE OF NAME**

I, **Deena Claudina Da Costa** resident of H.No 950 Escrivao Vaddo, Candolim Bardez - Goa and holder of Indian Passport bearing no. U6011571 would like to change my name from **Deena Claudina Fernandes** to **Deena Claudina Da Costa.** Hereafter in all my dealings and documents i will be known by my new name **Deena Claudina Da Costa.**

Sd/- **Deena Claudina Da Costa**

**IN THE COURT OF JOINT MAMLATDAR-III OF MORMUGAO TALUKA, VASCO-DA-GAMA, GOA.**

**MISC APPLICATION NO.1/25 IN Case No.Jt-I/MUND/PURCH/COR/02/2019(Jt-III)**

1. Mr. Rosario D'Costa, S/o Late Pascoal D'Costa, Major in age, service, R/o H.No. 57, Curpawaddo, Cortalim, Goa.
2. Mrs. Piedade D'Costa, W/o Rosario D'Costa, Major in age, housewife, R/o H.No. 57, Curpawaddo, Cortalim, Goa. ....Applicants

V/s

1. Shri. Jose Silva (deceased), Through his legal heirs, Filipe Silva (Since deceased) H.No. 58, Curpawaddo, Cortalim, Goa. Through his legal heirs 1(a) Smt. Filomena D'Silva 1(b) Smt. Prascilla D'Silva 1(c) Fatima D'Silva 1(d) Shri Herald D'Silva All R/o H.No. 58, Curpawaddo, Cortalim, Goa. 2. Mr. Francisco Silva (Since deceased), Through his legal heirs 2(a) Domingo Silva and 2(b) Remediana Silva All R/o Bombolem, Curpavado, Cortalim-Goa. 3. Smt. Maria Caitana Lucas (Since deceased) W/o shri Jose Costa, Major-in-age, housewife, R/o.H.No. 57, Curpawaddo, Cortalim, Goa. Through his legal heirs, 3(a). Mr. Gracian Costa, major in age, r/o H.No. 57/A, Curpawado, Cortalim, Goa. 3(b). Mr. Antonio Costa, major in age, r/o H.No. 57/A, Curpawado, Cortalim, Goa. 3(c) Mr. Caitan Costa (Since deceased), Leaving behind his Moiety, (i) Mrs Conceicao Costa r/o H.No. 57/A, Curpawado, Cortalim, Goa. Through his legal heirs, (ii) Mr. Jose D'Costa, Major-in-age, r/o H.No. 564, Bimptem, Bogmalo, Gao. (iii) Mr. Ellas D'Costa, Major-in-age, r/o H.No. 564, Bimptem, Bogmalo, Gao. (iv) Mr. Agnelo D'Costa, Major-in-age, r/o H.No. 564, Bimptem, Bogmalo, Gao. (v) Mr. Christo D'Costa, Major-in-age, r/o H.No. 564, Bimptem, Bogmalo, Gao. (vi) Socorina D'Costa, Major-in-age, r/o Behind Bus Stop, Zorint, Sancoale, Gao. (vii) Fatima D'Costa, Major-in-age, r/o H,No. 116, Pale-Velsao, Goa. (viii) Felicana D'Costa, Major-in-age, r/o H. No. 652/3, Thane, Cortalim, Goa. ...Opponents

**NOTICE**
**(Under Order V. Rule 20(1-A) of C.P.C.)**

**WHEREAS,** the above named applicants has moved an application dated 03/01/2019 in this court for Mundkar Purchase under sub-section 1 of section 16 of Goa Daman & Diu Mundkar (Protection from Eviction) Act, 1975.

**WHEREAS**, the Applicant No. 1 and applicant No. 2 since deceased, the legal heirs of the Applicants have filed application dated 19/02/2025 to bring legal heirs of Applicants No.1 & 2 on record as Applicants No. 1(a)-1(b).

**AND WHEREAS**, notices were sent to the Opponent by Registered A.D post. Only four notices were served remaining return unserved from postal authority with remark "Party left, Party expired, Intimated unclaimed, Insufficient address and Party out of Country, Return to Sender". The above named applicants legal heirs has moved application for substitute service by publication in newspaper dated 17/04/2025 and prayed that the opponents be served by substitute service by publishing on newspaper on the local daily newspaper.

**AND WHEREAS**, I am satisfied that this is a fit case for such publication of notice under V. Rule 20(1-A) of Civil Procedure Code 1908 and therefore, pass an order, directing the applicant to serve the opponents by publication of notice on the daily Local Newspaper.

**NOW THEREFORE**, Notice is hereby give to opponent to appear in the court of Joint Mamlatdar-III of Mormugao Taluka, Vasco da Gama, on **10/06/2025** at **10.30 a.m.** to answer the claim in person or by duly authorized agent along with material which you wish to reply upon.

**Take Notice that** in default of your appearance on aforesaid date and time above mentioned, the application will be heard and determined in your absence.

Given under my hand and seal of this court on this day **30th day of April, 2025.**

Seal

Sd/-
**(Gajesh P. Shirodkar)**
Jt-Mamlatdar-III of Mormugao Taluka, Vasco-da-Gama, Goa.

Sandeep Ads

**IN THE COURT OF INSPECTOR OF SURVEY & LAND RECORDS, PERNEM, GOA**

**File No. ISLR / DEM / PER / PER / 02 / 25 / 511**

1. Mrs. Shilpa Sadguru Bhaidkar, R/o H. No. 918, Bhaidwada, Korgaon, Pernem 403512 .......Applicant

V/s

1. Mr. Ranganath Suryakant Kalshavkar, R/o. H.No. 883, Bhaidwada, Korgao, Pernem, Goa 403512. 2. Mrs. Suhasini Sadanand Asnodkar, R/o. Behind Petrol Pump Tuem, Murmuse, Tuem, Pernem, Goa 403512. 3. Mrs. Shital Suresh Amroskar, R/o. H.No. 875/2/B, Bhaidwada, Corgao, Pernem Goa 403512 4. Mr. Conrad Lawrence Fernandes 5. Devidas Tukaram Pokhare 6. Mrs. Arti Sasane, All. R/o. Behind Petrol Pump Tuem, Murmuse, Tuem, Pernem, Goa 403512 7. Parshuram Atmaram Asolkar, R/o. Dandoswada, Mandrem, Pernem, Goa 403527 8. Vasant Paris Palni 9. Vijay Damodar Tamhankar 10. Natalin D'souza 11. Ana D'souza 12. Paulina Victor Fernandes 13. Francis Fernandes 14. John Francis Fernandes 15. Mereciana Pereira 16. Sandeep Bhalkrishna Ajagaonkar 17. Rohita Rajendra Harmalkar 18. Maria A. Deculha 19. Fraustin B. Dsouza 20. Jhurea Baya Das 21. Sandeep Sahadev Raul 22. Shubhangi Meghashyam Halarnkar 23. Carmelina D'souza 24. Ramesh Bhiva Harji 25. Sanjay Ramsurat Chauhan 26. Bhanudas Sagun Kalangutkar 27. Sitaram Damodar Sinai Dessai 28. Prakash Vasant Morje 29. Dharma Jaganath Naroji 30. Anand Madhukar Salgaonkar 31. Subhash Keshav Salgaonkar 32. Sujaya Subhash Salgaonkar 33. Ramesh Sitaram Sawant 34. Sadhana Rajan Mangli 35. Ulhas Bhiva Kalshekar 36. Sneha Sanjay Parsekar 37. Tulshidas Atmaram Talkar 38. Devendra Krishan Salgaonkar 39. Kashinath Dattaram Salgaonkar 40. Antonio Agostinho Antao E Ferndades 41. Mario Irenue Camilo Antao E Fernandes 42. Sabaji Vithal Naroji 43. Sadhana Sabaji Naroji 44. Sudhir Nayso Bagli 45. Sudhiksha Sudhir Bagli 46. Antonio M. A. Fernandes 47. Mario Yerenim Kamil M.A. Fernandes 48. Suryaji Harishchandra Salgaonkar 49. Martin Jacky Gerald 50. Maria C. Dcunha 51. Michael Claudine D'Cunha 52. Madhu Dattaram Salgaonkar 53. Government Hospital / C.H.C., Pernem, All R/o. Murmuse, Tuem, Pernem, Goa 403512 54. Ashok Suryakant Kalangutkar, R/o. Deulwada, Parsem, Pernem, Goa 403512 55. Ramnath Mahadev Sawant, R/o. Deulwada, Parsem, Pernem, Goa 403512 56. Executive Engineer, W.D. II, PWD Panaji, Goa 403001 ...Respondents

**PUBLIC NOTICE**

**WHEREAS**, the above named applicant has filed an application dated 02/01/2025 before this Court under section 114 of Land Revenue Code 1968, for Demarcation of property surveyed under Survey no. 273/1-AR-4 of Pernem village of Pernem Taluka.

AND WHEREAS, the applicant Mrs. Shilpa Sadguru Bhaidkar, vide application dated 25/04/2025 submitted that the notices sent through Reg. AD to the respondents No. 2, 4, 6, 7, 8, 9, 10, 12, 13, 14, 15, 16, 18, 19, 20, 21, 23, 24, 25, 27, 28, 29, 33, 34, 40, 41, 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 49, and 52 are returned back with the endorsement on the envelopes "Addressee cannot be located, Party Expired, Door Locked" The applicant states that he is unaware about present addresses of the unsaved respondents / heirs and hence prayed for substitute service on notice by serving notice through publication in the local daily newspaper.

AND WHEREAS I am fully satisfied that this is a fit case for such a publication.

Now therefore, the adjoining holder / interested party in above demarcation Case, notice is hereby given that demarcation of above said property is fixed on 23/05/2025 @ 10.30 a.m. onwards and you are directed to remain present at the site on the abovementioned date, failing which demarcation will be carried out in your absence. The applicant shall remain present at the office of Inspector of Survey and Land Records, Pernem at 9.30 a.m failing which the case will be rejected / dismissed.

Further, notice is given that said matter is scheduled for hearing on 17/06/2025 @ 11:30 a.m. at which date and time you are directed to remain present in the Court of Inspector of Survey and Land Records, Pernem, Goa, to file your say failing which matter will be disposed in your absence.

Given under my hand and seal of this office on this 30th day of April 2025.

Seal

Sd/- Vinita V. Kambli
Inspector of Survey & Land Records, Pernem, Goa